The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि प्रबोधन

डॉ. शरद वाघोळे
मराठी विभाग प्रमुख, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर जि. वाशिम

संत वाङ्.मयाच्या निर्मितीचे मुख्य प्रयोजन जरी परमेश्वर भक्ती हे असले तरीपण मानवी जीवनाच्या कल्याणाचेविचार त्यात येतात. मानवी जीवनाला दिशा दाखविण्याचे कार्य संत साहित्याने केले आहे. यादव काळापासून निर्माणझालेल्या संत परंपरेच्या साहित्याचा अभ्यास करता संतांनी विश्वकल्याण एवढी व्यापक भूमिका ठेवलेली दिसते. याभूमिकेला अनुसरून त्यांचे वाङ्मय निर्मिती कार्य झाल्याचे दिसून येते. संतांनी आपल्या लेखनातून अध्यात्म निरूपण तरकेलेच परंतु सोबतच तत्कालीन समाज व्यवस्था, त्यातील स्पृश्य अस्पृश्य भेद स्त्री जीवनातील बंधणे, लोकव्यवहार,लोकमानसिकता यातील दोष दर्शवित त्यावरील मार्ग सांगितलेले आहेत. लोकांना त्यांच्याच भाषेत, त्यांच्याच जीवनातीलसंदर्भ देत केलेले विवेचन लवकर आत्मसात होते हे लक्षात घेत प्रबोधनाचे माध्यम व स्वरूप यात महत्वपूर्ण बदल केलेलादिसतो.

संत ज्ञानेश्वर यांनी पसायदानाद्वारे विश्वकल्याणाचा प्रसाद परमेश्वराकडे मागितला. परमेश्वराने सर्वांना सुखाचेदान दयावे हा व्यापक विचार व्यक्त् करताना त्यांनी जे खळांची व्यंकटी सांडो तया सत्कर्मी रती वाढो असे विधान करूनदृष्टांचा नाश न करता त्यांच्यातील वाईट नाश होत त्यांच्या मनाला सत्कर्माचा ध्यास लागून त्यांच्या जीवनाचे कल्याणव्हावे हा विचार ते व्यक्त करतात. मानवी जीवन हे सामाजिक, सांस्कृतिक , धार्मिक व मानसिकदृष्ट्या चांगल्या जीवनव्यवहाराचे असावे हा विचार येथे व्यक्त होताना दिसतो. मानवी जीवन व्यवहाराच्या भाषेला न्याय देण्याचे कार्य संतज्ञानेश्वर यांनी केलेले दिसते. त्यांनी तत्कालिन मराठीतून आपले ज्ञान विशद केले. ज्ञानाचा मार्ग हा लोकभाषा असवा हेकृतीतून सिद्ध करणारे ज्ञानेश्वर होय. मानवी जीवनातील सत्संग, भक्ती यांचे महत्त्व सांगत त्यांनी मानवी जीवनाला वळणलावण्याचे कार्य केलेले दिसते.

महानुभाव पंथ हा मानवी जीवन व्यवहारातील विसंगती सांगत त्या दूर करणारा पंथ होय. कोणत्याही जातीपातीचा विचार न करता सर्वसमावेशक हा धर्म होय. मानवी जीवनात स्त्री ही परावलंबी व धर्मक्षेत्रात दुय्यम वागणूकमिळणारी होती महानुभाव पंथाने भक्तीचे दारे महिलांसाठी खुले केले. लीळाचरित्र,स्मृतीस्थळ, दृष्टांतपाठ सारख्याग्रंथांतून याचे विवेचन येते. ज्या काळात स्त्रियांना धर्मग्रंथ वाचण्याची मुभा नव्हती त्याकाळात महानुभाव पंथाने स्त्रियांनाभक्तीचा, पंथाच्या कार्यात पुरूषांच्या बरोबरीने स्थान दिले. जाती जातीतील श्रेष्ठ कनिष्ठ हा भेद या पंथात नव्हता. सर्वांनासमान लेखण्याची शिकवण या पंथाने दिली. याच काळात बसवेश्वर हे महान तत्त्वचिंतक झाले होते. बसवपुराणमध्ये त्यांचेविचार दिसतात. बसवेश्वरांनी विचार आचार यातील शुद्धता महत्वाची मानली.परस्पराप्रती प्रेम,सामंजस्य, सद्भाव, प्रेम,नीतीतत्व अशा बाबी त्यांच्या लेखनात, आचरणात दिसतात. मानवाची अंतरंग शुद्धता म्हणजे मन, बुद्धी, वैचारिकतायाची शुद्धता होय तर बहिरंग शुद्धता म्हणजे त्याचा आचार, वर्तन होय. यावर त्यांनी आपले लेखन केले आहे.

'नको करू चोरी
नको करू हत्या
न्को बोलू असत्य
न्को धरू मनी द्वेष
नको करू आत्मस्तुती
नको करू निंदानालस्ती,
नको मानू कोणा तुच्छ
हीच खरी अंतरंगशुद्धी
हीच बहिरंगशुद्धी अन्
हीच कूडलसंगमास प्रसन्न करण्याची खरी पद्धती १

बसवेश्वरांनी सामाजिक वर्तनाचे सप्तसूत्र सांगितले आहे. त्यांनी आपल्या विचारांनी समाजास वळण लावले. शुद्ध चारित्र्यांनी महत्त्वपूर्ण मानले संत ज्ञानेश्वरांनी पसायदानातून जसे मानवी जीवन व्यक्त केले तसाच विचार बसवेश्वर करतात.धर्मक्षेत्रात अंधश्रद्धा वाढली होती. दगडाला, झाडाला देव मानून त्याची पूजा करू नका, अंधश्रद्धा बाळगुण जीवनाचेकल्याण होत नाही. होम हवन सारख्या प्रथा कशा घातक आहे यासंबंधी प्रबोधन करून त्यांनी लोकमानसातील गैरसमज दूरकेले.संत नामदेव हे भक्तीची पताका घेत उत्तर भारतात गेले. समतेचा संदेश देत मानवी जीवनातील विषमता दूर करण्याचकार्य त्यांनी केलेले दिसते.

नाना परीची दैवते। बहुत असती असंख्याते ।
सेंदूर शेरणी जीं इच्छितीं । ती काय आर्त पुरविती।। २

संत एकनाथ यांनी आपल्या भारूडातून लोकजीवनाचे विविध संदर्भ देत मानवी जीवनातील विषमता दूर करत मानवीजीवनाला सरल मार्ग दर्शविला आहे. नाथांनी आपल्या एकनाथी भागवतातून लोकमानसाला रूचेल, पचेल अशा संदर्भासहअध्यात्म निरूपण केले आहे. 'लोकजीवन उन्नत व्हावयाचे असेल तर लोकभाषेला धर्मभाषेची प्रतिष्ठा मिळाली पाहिजे.तिच्यात ज्ञानभाषेचे सामश्र्य आणि लोकजीवनाचे सौदर्य आले पाहिजे. अशी ज्ञानदेव - एकनाथांची धारणा होती. म्हणूनचत्यांनी संस्कृतमध्ये लिहिणे शक्य असताना कटाक्षाने मराठीतच लिहिले. मराठीला प्रतिष्ठित करण्यासाठी आपली वाणी -लेखणी झिजविली. त्यामागे जनसामान्याविषयी कळवळा होता आणि लोकांशी संवाद साधण्याची ओढ होती.' ३ संतएकनाथांनी आपल्या लेखणीद्वारे मानवाने गृहस्थाश्रमात कसे राहावे कसे आचरण करावे याबाबत विवेचन केले आहे.त्यांनी संसाराचे महत्त्व साकार करून संसार व परमार्थ दान्हीची सांगड घातलेली दिसते.

नाही कुळदेवां पूजणें । मायबापातें वंचणें ।
शेखीं गुरूतेंहि ठकणे । परी सर्वस्व देणें स्त्रियेसी । ।
एवं माकड जैसें गारूड्याचें । तैसा स्त्रियेचेनि छंदें नाचे ।

ऐशिया स्त्रैणाचे संगतीचें । तेथे सुख कैसे साधकां । ।४

नाथांनी अध्यात्माचे निरूपण करताना लोकजीवनाच्या बाबी आपल्या लेखनातून साकार केल्या. हे करताना लोकमनात असलेली दुषित विचारसरणीवर त्यांनी प्रहार केला. आत्मोन्नतीचा, आदर्शजीवनाचा मार्ग त्यांनी आपल्या साहित्यातून दर्शविला.संत तुकाराम म्हणजे तत्कालीन वाईट रूढी, प्रथा, भोंदुगिरीवर प्रभावीपणे आघात करणारे समाजसुधारक होते सामान्यजनता धर्माच्या नावाखाली लुबाडली जात होती. 'बुडता हे जन देखवेना डोळा' ही त्यांची साहित्य निर्मितीमागील प्रयोजनहोते. सामान्य जनतेला वास्तव जीवनाची ओळख करून देत त्यांनी तत्कालीन समाजधुरीनांना आव्हान दिलेले दिसते. त्यांचेविचार मानव कल्याणाचे होते. पर्यावरणवादी असलेले संत तुकाराम समाजातील साधु संतांची खरी भूमिका सांगणारे होते.

जे का रंजले गांजले । त्यासे म्हणे जो आपुले । ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथैचि जाणावा । ।
मृदू सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ।।
ज्यासी आपंगिता नाही । त्याशी धरि जो ह्दयी । ।
दया करणे जे पुत्रासी ।तेची दास आणि दासी । ।
तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती । ।५

संत तुकाराम हे मानवी कल्याणाचा विचार आपल्या साहित्यातून करतात. हे करताना लोकांना रूचेल, पचेल अशापद्धतीची रचना करून त्यांनी मार्गदर्शन केले. आजही त्यांच्या रचना लोकमानसात घर करून आहे. त्यांचे विचार सरल,सहज पद्धतीने व्यक्त होतात. दैनदिन जीवनातील बाबींद्वारे त्यांनी आपले विचार रूजवले आहे. अंधश्रद्धा, संसार यावरकेलेले भाष्य आजही उपयुक्त आहेत.'आपल्या लौकीक जीवनाचा ढाचा बदलणे जरी आपल्या हाती नसले तरी परमार्थाच्याप्रांतात आपण सर्वस्वी स्वतंत्र आहोत. या बाबतीत आपले पूर्वसंचित आड येऊ शकत नाही. आपला भक्तीभाव, उत्कृष्ट,अनभ्य व अविचल असेल तर कुणालाही आत्मसाक्षात्काराचे शिखर गाठता येते. भक्ताच्या मेळाव्यात कुणी लहान नाही,कुणी मोठा नाही. सर्व माणसे एका जगन्माउलीची लेकरे आहेत. एकाच चितृत्वाचे अंश आहेत. तेव्हा ईश्वरोपासकानेमनुष्यमात्राशी बंधुभावाने आत्मोपम्य बुद्धीने वागले पाहिजे अशी संतमंडळीची शिकवण होती. अशा त-हेने आपल्या भक्तीसंप्रदायात नामदेव, तुकारामादि संतांनी स्वातंत्र्याचे व ममतेचे वातावरण ब-याच मोठ्या प्रमाणात निर्माण केले होते.'६शिवकाळातील दुसरे महत्त्वाचे संत म्हणजे संत रामदास होय. मानवी मनाचा, त्याच्या वर्तनाचा विचार करून त्यांनीमनाचे श्लोकाची निर्मिती केली. मना सज्जन्ना भक्ती पंथेची जावे, सुसंगती सदा घडो, कुसंगती ना घडो असे श्लोक मानवीजीवनाला मार्गदर्शक आहेत. त्यांनी लोकमानसावर नियंत्रण ठेवून कार्य करणे कसे उत्तम आहे हे सप्रमाण सिद्ध केले आहे.कमीत कमी शब्दांतून जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे कसब त्यांच्या लेखणीत दिसते.

आधुनिक काळात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेद्वारे ग्रामीण जनतेला विकासाचा मार्ग दाखविला.लोकमनाला भावेल अशा माध्यमातून त्यांनी प्रबोधन केले. त्यांचा हेतू लोकमनाला वळण लावण्याचा दिसतो. ग्रामीणजीवनातील रोजचे उदाहरण देत प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले आहे.

जैसा कर्ज घेवोनि खर्च करी । तैसा कमाईस लक्ष न धरी ।
तेणे संकटे येती घरोदारी । मग विचारी काय करू ?। ।

त्यांचे असे विचार आजही उपयुक्त आहेत. या आधुनिक काळात माणूस भौतिक सुखाच्या मागे लागला. 'चादर पाहून पायपसरावे' या अनुभवाकडे दुर्लक्ष करून कर्ज काढून तो सुखासीन जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. परंतु कर्जाचा फास त्यालाविनाशाकडे नेतो. मानवी जीवनातील अशा मानसास राष्ट्रसंत मार्ग दाखवितात.शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांचा प्रसार आपल्या कीर्तनातून करणारे संत गाडगे बाबा हे आधुनिक काळातीलसंत होय. प्रश्नोत्तर रूपी कीर्तनातून त्यांनी लोकांच्या समस्यावर मार्गदर्शन केले. उक्ती व कृती यातील एकवाक्यता असलेलेगाडगे बाबा अंधश्रद्धा, साक्षरता यावर प्रबोधन करत होते. देवाच्या नावाखाली मुक्या जनावरांचा बळी देणे, जातीपाती,उच्च नीच अशा विविध समाजपयोगी विषयांवर त्यांनी आपली कीर्तने केली. श्रमाचे महत्त्व त्यांनी विशद केले.समाजमानसाने देवभोळेपणा सोडून कर्माला महत्व देण्याचे आवाहन ते नेहमी करत. अनाथआश्रम, धर्मशांळा बांधूनगोरगरिबांची सेवा हिच खरी ईश्वरसेवा होय, हे त्यांनी आपल्या आचरणातून दाखवून दिले. स्वताचे नावही न ठेवतालोकमानसास जीवनाचा खरा मार्ग दाखविणारे संत गाडगे बाबा होते. त्यांच्या विचारांची गरज आताही आहे. कारणसमाजाने त्यांना स्वीकारले परंतु विचारांना पूर्णपणे स्वीकारले नाही.संत साहित्य हे मानवी जीवनाला वळण लावण्याचे कार्य करते. या साहित्यातून येणारे विचार हे मानवीकल्याणाचे आहे.

संत ज्ञानेश्वरांनी पसायदानात मांडलेली विश्वकल्याणाची भूमिका असो किंवा तुकडोजी महाराज यांची

भारत सुखी राहण्याचा विचार असो मानव जातीचे कल्याण त्यातही अंतरंगाची शुद्धता संतांनी जास्त महत्त्वाची मानलेलीदिसते. तुकारामांचा धर्म विचार हा श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धा पाळत असलेल्या लोकमनाला उद्देषून आहे. मानवीकल्याण ही संतांची भूमिका लोकजीवनाचे संदर्भ देत जेव्हा येते तेव्हा प्रबोधन माध्यम कसे असावे याचा पुरावा संतानीसप्रमाण सिद्ध केला. संत हे धर्माच्या नावाखाली चाललेल्या फसवणुकीबाबात सावध राहण्याचे विचार मांडताना आधीप्रपंच करावा नेटका मग घ्यावे परमार्थ विवेका ही जाणीव करून देतात. काळानुरूप् संत विचारात बदल झालेला दिसूनयेतो अगोदर ज्ञानाच्या अध्यात्माच्या माध्यमाचा संस्कृत विचार सोडून मराठीचा पुरस्कार संत ज्ञानेश्वर संत चक्रधर संतएकनाथ करतात नंतरच्या काळात समाज व्यवस्थेतील दुरावस्था लक्षात घेत त्यावर विचार मांडून प्रबोधन करणारे संतएकनाथ संत तुकाराम प्राामुख्याने दिसतात मनाचा विचार करून मनावर नियंत्रण कसे ठेवावे व चांगले वाईट कसे ओळखावेयाचे प्रबोधन संत रामदास करताना दिसतात. एकंदरित संतांनी मानवी जीवनाच्या कल्याणाचा विचार करून कल्याणाचेदान परमेश्वराकडे मागितलेले दिसते.

संत हे मुळात विचारवंत होते. आपण त्यांना संतत्त्व देत त्यांची पूजा केली. त्यांचे ग्रंथ देवघरात ठेवलेत्याचीही पूजा केली. परंतु बुडता हे जन देखवेना डोळा या विचारांनी त्यांनी जे लोकोद्धाराचे मार्ग सांगितले, त्याचेअनुसरण अजुनही लोकमानसाने केलेले दिसत नाही लोकमानसाला वळण लावताना त्यांनी लोकभाषेचे महत्व विशद केले.लोकजीवनातील उदाहरण देत समजावून सांगण्याची पद्धत शिक्षणप्रणालीला माध्यमाचे, अध्यापनाचे मार्ग दर्शविणारेआहेत. परंतु या दृष्टीने संत साहित्याचा अभ्यास झालेला दिसत नाही.

निष्कर्ष -

१) संत साहित्य हे लोकजीवनाला तमातून तेजाकडे नेणारे आहे.

२) संतांनी आपले प्रबोधन करताना लोकभाषा, लोकजीवन यांची सांगड घालत आपले कार्य केले.

३) संतांनी मनोरंजनातून प्रबोधनही संकल्पना राबविलेली दिसते.

४) प्रबोधनाचे माध्यम, त्यातील क्लिष्टता दूर करत लोकभाषा, लोकजीवन यातील उदाहरणांचा प्रभावी वापर हे संत वाड्.मयाचे वैशिष्ट्ये आहे.

५) संत वाड्.मय जरी अर्वाचीन वाटत असले तरी वर्तमानातील समस्यांवर त्यात मार्ग आहे. म्हणूनच संत वाड्.मयाला कालातीत म्हटले जाते.

६) संतांनी लोकभाषाचे संवर्धन केलेले दिसते.

संदर्भ -

१.संपादक - भगत रा.तु., संतसाहित्य आणि समाजप्रबोधन, दिलीपराज प्रकाशन,पुणे, आवृत्ती पहिली २००५, पान १७

२.संपादक - भगत रा.तु., संतसाहित्य आणि समाजप्रबोधन, दिलीपराज प्रकाशन,पुणे, आवृत्ती पहिली २००५, पान ५२

३.संपादक शेंडगे बाबासाहेब, श्री एकनाथ परंपरा आणि प्रभाव, काॅन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली २०१४,
पान १०

४. पेंडसे श.दा., भागवतोत्तम संत एकनाथ,काॅन्टिनेंटल प्रकाशन,पुणे, आवृत्ती दुसरी२००७, पान १९८

५.संपादक सावरकर सुभाष, अक्षरवैदर्भी, प्रकाशक जनसाहित्य साधना, अमरावती, आवृत्ती पहिली २०१०, पान ५८

६.सरदार गं.बा., संत वाड्.मयाची सामाजिक फलश्रृती, श्री विद्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती चैथी १९८२, पान १३६'